# प्रेस नोट

दि. २४/११/२०१६ रोजी अमित नरहरीराव घुले,सपोनि, पो.हवा.३४४१ लोंढे,पोलीस नाईक ५८२६ थिकोळे,पो.ना.२१६६ जाधव,पो.शि८१३४ कर्पे,पो.शि.७३३० राऊत,पो.शि.९८१५ भोसले,पो.शि.८८०५ पठाण,पो.शि.९८२९ धावडे असे मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री वसंत कुवर लष्कर पोलीस स्टेशन पुणे शहर सो. यांचे सह हजर असताना पो.हवा.३४४१ लोंढे,यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, एम.जी.रोड कॅनरा बॅक समोर इसम नामे भरत राजमल शहा रा.शंकर शेठ रोड हा त्याचेकडील एक कोटी रुपये ब्लॅकमनी २५ टक्के भावाने आदलाबदल करुन व्हाईटमनी करणे करीता येणार आहे. याबाबत मा.पंकज डहाणे पोलीस उप आयुक्त, परि २ व मा.निलेश मोरे सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग यांना याबाबत माहिती कळविली. त्यांचे आदेश व मार्गदर्शनानूसार बातमीचे ठिकाणी जावून कारवाई करणे असल्याने पंच नामे १) विक्रांत विजय बिडलान वय-३६,धंदा-नोकरी रा.ई-ब्लॉक,रुम-५ पी.सी.बी.कॉटर्स सोलापुर बाजार पुणे. २) राकेश प्रेमसिंग कुशवाह वय-३७ रा.घर नं.१२५ नेताजी नगर नवी सांगवी पिपळे गुरव पुणे.यांना सोबत घेवून मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री वसंत कुवर यांचे सुचनेनुसार आम्ही व वरील स्टाफ, पंचासह बातमीच्या ठिकाणी खाजगी वाहनाने, एम.जी.रोड कॅनरा बॅक समोर जावून खात्री केली असता त्याठिकाणी भरत राजमल शहा असे त्याची कार क्र.एम.एच.१४ बी.सी.६२९४ मिळून आले आहे. इसम नामे भरत राजमल शहा याचेकडे कापडाचे पिशव्यांमध्ये एकूण किंमत १,१२,५०,०००/- रुपये मिळून आले त्यामध्ये ५०० रु.दराच्या २२,४४४ नोटा व १००० रु.दराच्या २८ नोटा असे रोख रुपये भरत राजमल शहा हे बदलून घेण्याकरीता आले असल्याचे सांगितले. सदरची सपुर्ण रक्कम पंचनाम्याने ताब्यात घेण्यात आलेली आहे.

मा.सहा.पोलीस आयुक्त सो लष्कर विभाग यांनी पुढिल कारवाईसाठी आयकर विभागाचे अधिकारी श्री.के.के.मिश्रा यांना फोन व्दारे कळविले असुन आयकर विभागा मार्फत दि.२५/११/२०१६ रोजी सकाळी कारवाई करणार आहेत.तसेच ताब्यात घेतलेली रक्कम पोलीस स्टेशन येथे सेफ कस्टडी मध्ये ठेवण्यात आलेली आहे.तसेच भरत राजमल शहा यांना चौकशी कामी दि.२५/११/१६ रोजी सकाळी ०९.०० वा. हजर राहण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक,गुन्हे
लष्कर पोलीस ठाणे पुणे,पुणे


महाराष्ट्र पोलीस